स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI: Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

१९ वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट




बीड : प्रतिनिधी

"...पप्पा सांगा ना तुमची रोज आठवण येते मी काय करू?" वैभवी संतोष देशमुख या बापाच्या आठवणीने व्याकुळ झालेल्या लेकीच्या वेदना प्रसार माध्यमांत पाहिल्यावर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. अजित पवारांसारखे मंत्री असतील तर बेटा न्यायाची अपेक्षा करू नकोस! कारण महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार हे उलट्या काळजाचे आहे. त्यांना जन भावनेच्या आधाराची किंमत नाही, त्यांनी कोणत्याही परिस्थितीत सत्ता टिकून ठेवण्यासाठी आणि उपभोगण्यासाठी नैतिकतेच्या ठिकऱ्या उडविल्या आहेत. तसेही मागच्या आठवड्यात "तुम्ही मला मतदान केले, याचा अर्थ तुम्ही माझे मालक नाहीत" असे ठणकावून सांगत अजित पवार यांनी महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार जनतेच्या सेवेसाठी अजिबात नाही, हे उभ्या महाराष्ट्राला दाखवून दिले आहे. अशा संतप्त भावना सोशल मीडियावर जनसामान्यांकडून व्यक्त होताना पहावयास मिळत आहेत.

# बेटा अजित पवारांसारखे मंत्री जर महाराष्ट्रात असतील ...तर न्यायाची अपेक्षा करू नकोस!

## वैभवीच्या व्याकुळ वेदनांनी उभ्या महाराष्ट्राचे हृदय पिळटून निघाले!


नैतिकतेच्या ठिकऱ्या उडविणारे महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार म्हणजे उलट्या काळजाचे!

दैनिक 'वास्तव' ने वृत्त प्रकाशित करताच अनेकांचे डोळे पाणावले तर नेटकऱ्यांनी अजितदादांच्या भुमिकेबद्दल व्यक्त केला तीव्र संताप

मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या स्टाईलने देशमुख परिवाराला न्याय मिळवून द्यावा लागेल!!

●बीड जिल्ह्यातील मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. या हत्तेला आता महिना उलटला आहे. मारेकऱ्यांची नावे माहीत असूनही सर्व मारेकरी अजूनही जेरबंद करण्यात आलेले नाहीत. या प्रकरणाचे धागेद्वारे कुठपर्यंत गेले आहेत हे देखील सरकारला माहीत आहे मात्र सरकारमधील नेतेमंडळी अडचणीत येत असल्यामुळे या प्रकरणाला वेगळीच बगल देण्याचा विचार सरकारचा दिसून येत आहे. संतोष देशमुख सारखा समाजप्रिय, गावावर नितांत प्रेम करणारा आणि सर्व जाती धर्मांशी एकरूप राहणारा सरपंच केवळ लुटारू राजकारण्यांचा बळी ठरला. शासकीय व्यवस्थेमध्ये आज लुटारूंच्या टोळ्या सक्रिय झालेल्या आहेत. अशा परिस्थितीत सत्यवादी वागणारा सरपंचाचा बळी घेण्यात आला.

### सरपंच संतोष देशमुख लुटारू राजकारण्यांचा बळी ठरला!



### मुख्यमंत्र्यांना गांभीर्य नाही!

● मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खरंतर मसाजोग येथे जाऊन कुटुंबीयांची भेट घेणे अपेक्षित होते. मात्र त्यांनी बीड जिल्ह्याकडे कानाडोळा केला. अखेर संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या घरी जाऊन भेट घेतली. त्या ठिकाणी जाऊन त्यांनी न्यायाची अपेक्षा केली.

● मुख्यमंत्र्यांनी वेळ मारून नेत केवळ आश्वासन दिलं मात्र त्यांच्या चेहऱ्यावर कोणतेही गांभीर्य दिसून येत नव्हते. या प्रकरणात खुद्द मुख्यमंत्रीच गांभीर्यपूर्वक नसल्यामुळे हे प्रकरण दुर्लक्षित होत आहे.

### न्याय करणाऱ्या देशमुखांना न्याय मिळेल का?

●संतोष देशमुख हे मागील तीन टर्म पासून सरपंच होते. त्यांना राहायला देखील नीट घर नाही. कोणते वाहन नाही, कोणतेही प्रॉपर्टी नाही. केवळ समाजसेवेसाठी त्यांनी या पदाचा उपयोग केला. गावातील सर्व जाती धर्मात एकी निर्माण करून न्यायाची भावना त्यांनी निर्माण केली होती. म्हणून गावचा मुळ रहिवाशी नसतानाही त्यांना गावकऱ्यांनी सलग तीन वेळा सरपंच केलं होतं. एवढं चांगलं काम करणाऱ्याला जर न्याय मिळत नसेल तर अवघड बाब आहे अशा भावनाही व्यक्त होत आहेत.

### जरांगे पाटलाच्या स्टाईलने घ्यावा लागेल न्याय!!

●मराठा योद्धा मनोज जरंगे पाटील यांनी जर लक्ष घातलं नसतं तर मसाजोग प्रकरण तिथेच दाबण्याचा प्रयत्न पोलीस प्रशासनाने केला होता. जरांगे पाटलांनी त्या ठिकाणी ठिय्या मांडला आणि त्यानंतर गुन्हा दाखल झाला. जरांगे पाटील यांनी या प्रकरणात पहिल्यापासून लक्ष घातलं आहे. त्यामुळे हे प्रकरण आतापर्यंत टिकलं आहे. या प्रकरणात काही राजकीय मंडळींनी संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी भूमिका घेतली असली तरी काही राजकीय मंडळी दुर्लक्ष करत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे जरांगे पाटील यांच्या स्टाईलनेच प्रकरणात न्याय घ्यावा लागेल अशा भावना लोकांमधून व्यक्त होत आहेत.

### सर्वसामान्य लोकांना अजित पवारांसारख्या नेत्याकडून अपेक्षा करणं चुकीचं वाटतं!!

● सर्वसामान्य लोकांना अजित पवार सारख्या नेत्याकडून अपेक्षा करणं चुकीचं वाटत आहे. संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्यासाठी अजित पवार पुढाकार घेताना दिसून येत नाहीत. हे सगळं राजकीय मिली भगत असल्याचं चित्र आता लोकांना दिसू लागलं आहे. संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट देखील घेतली मात्र फडणवीस देखील या प्रकरणात ताकदीने प्रयत्न करताना दिसून येत नाहीत. त्यामुळे ही सर्व राजकीय मिलीभगत असल्याचं दिसून येत आहे. याबाबत मुलींच्या वेदना शब्दात वर्णन करण्या पलीकडच्या असल्या तरी त्या वेदना जाणून घ्यायला सरकारला मात्र वेळ असल्याचं दिसून येत नाही.






### अजीत पवार बीड जिल्ह्यातील पुढाऱ्यांना वाचवत आहेत का?

एका दलित बांधवाला झालेली मारहाण आणि त्याला केलेला विरोध संतोष देशमुख यांच्या अंगलट आला. संतोष देशमुख यांचे सर्व मारेकरी अजूनही सापडलेले नाहीत. त्यांना फासावर लटकविण्याची मागणी संपूर्ण महाराष्ट्रातून होत आहे. तरी देखील योग्य पद्धतीने कारवाई चालू असल्याचे दिसत नाही. या प्रकरणात सुत्रधार मंडळींचा शोध घेणे आवश्यक आहे. अजित पवार सारखे उपमुख्यमंत्री महाराष्ट्रात असताना देखील याकडे दुर्लक्ष केले जात आहे. अजीत पवार यांनी लक्ष दिल तर लवकर न्याय मिळू शकतो अशी लोकांची धारणा आहे. अजित पवार यांनी मसाजोग येथे जाऊन भेट दिली मात्र तेथून काढता पाय घेत त्यांनी या प्रकरणाकडे दुर्लक्ष केलं आहे. अजीत पवार बीड जिल्ह्यातील राजकीय पुढाऱ्यांना वाचवत आहेत का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## बीडमध्ये होणार सीनिअर क्रिकेटसाठी निवड चाचणी

बीड : प्रतिनिधी

बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्यावतीने सीनिअर वयोगटातील संघ निवडीसाठी शनिवारी (दि.११) दुपारी २ वाजता बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या सीनियर वयोगटातील निमंत्रितांच्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी बीड जिल्हा संघ निवडीसाठी ही चाचणी होत असून पात्र खेळाडूंनी पूर्ण गणवेशात आधार कार्ड, जन्मप्रमाणपत्राच्या दाखला व प्रवेश शुल्कासह वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर, डॉ. योगेश क्षीरसागर, सचिव आमेर सलीम,



महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान, शेख आरेफ, अतीक कुरेशी, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखूदे, सरफराज मोमीन, अक्षय नरवडे, पठाण शाहरुख यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## धनंजय मुंडे यांनी घेतली ज्येष्ठ नेते छगन भुजबळांची सदिच्छा भेट अन् आशीर्वाद

● अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या कामकाजाबाबत घेतले मार्गदर्शन

मुंबई : प्रतिनिधी

राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री छगन भुजबळ यांची मुंबई येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले आहेत.

ज्येष्ठ नेते छगन भुजबळ हे मागील काळामध्ये बरेच वर्ष अन्न व नागरी पुरवठा खात्याचे मंत्री राहिलेले आहेत, त्यादृष्टीने या विभागाचे कामकाज अधिक प्रभावीपणे करण्यासाठी धनंजय मुंडे यांनी श्री छगन भुजबळ यांच्याकडून





मार्गदर्शनही घेतले असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री महोदयांनी सुचवलेला शंभर दिवसांचा कृती कार्यक्रम १००% यशस्वी करण्यासाठी धनंजय मुंडे यांच्या विभागाला सूचना दरम्यान धनंजय मुंडे यांनी आज मंत्रालयातील त्यांच्या दालनामध्ये अन्न व नागरी पुरवठा तसेच ग्राहक संरक्षण मंत्रालयाच्या सचिव श्रीमती जयश्री भोज यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांची चर्चा करत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुचवलेला शंभर दिवसांचा कृती कार्यक्रम शंभर टक्के यशस्वी करण्याच्या दृष्टीने व अधिक प्रभावी पद्धतीने कामकाज करण्याच्या दृष्टीने विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत.

**सकारात्मक उपक्रम** ● वाढदिवसाला कोणताही बडेजाव नाही; फक्त सामान्यांसाठीच साजरा केला वाढदिवस.....!!!

## आरोग्य सेवक बाजीराव चव्हाण यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

मोरगाव : युवासेना मराठवाडा निरिक्षक मा. बाजीराव दादा चव्हाण यांचा वाढदिवस अनाथ व गरजूवंतान सोबत साजरा करण्यात आला. वाढदिवस म्हटल की अतिशबाजी आणि धिंगाणा हार तुरे ही संकलपना आज समाजा मध्ये रूढ झालेली असताना. आरोग्य सेवक बाजीराव दादा चव्हाण यांनी आपल्या कार्यकर्त्यांना व मित्र परिवार यांना माझ्या वाढदिवसानिमित्त कुठ्ल्याही प्रकारचा बडेजाव पणा न करता व मला शुभेच्छा देण्यासाठी माझ्याकडे मुंबईला न येता. आपल्या मातीतील गरजूवंत लोकांची सेवा करुण माझा वाढदिवस साजरा करा अश्या सूचना दिल्या. दादांनी दिलेल्या सूचनेवरून मित्र परिवारने छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे आरोग्य तपासणी शिबिर व रक्तदान शिबिर आयोजित केले.

मोरगाव येथील नागनाथ विद्यालय येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व फळ वाटप केले. पिंपळनेर येथील संनराईज इंग्लिश स्कूल विद्यालय येथे शालेय साहित्य वाटप. बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्र येथे अन्नदान तसेच सहारा अनाथालय गेवराई येथील मुलांना जेवणाची व्यवस्था करण्यात आली. यानंतर जिल्हा रुग्णालय बीड येथे दि. ९ जानेवारी २०२५ रोजी जन्म झालेल्या मुलींना चांदीचे चैन व मुलींच्या मातेस साडी वाटप करण्यात आले. या सर्व सामाजिक उपक्रमांनी बाजीराव दादा चव्हाण यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा आणि दिर्घआयुष्याचा शुभेच्छा





मित्र परिवार व युवासेने कडून देण्यात आल्या. या सर्व उपक्रमांसाठी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हा प्रमुख महादेव मातकर, युवासेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवासेना जिल्हा प्रमुख अजय सुरवसे, जिल्हा प्रमुख सूमित कोळपे, मोरगावचे सरपंच लिंभाजी मामा जाधव, डॉ. ज्ञानेश्वर जाधव, सूरज चुंगडे, कृष्णा यादव, उध्दव मडके, रघुनाथ बन, शरद झोडगे, विलास मस्के, महेश साळुंखे, प्रसाद चव्हाण, जोतिराम फरतडे, पंकज कदम, व इतर पदाधिकारी व सहकाऱ्यांनी कार्यक्रमाचे नियोजन करून बाजीराव दादा चव्हाण यांचा वाढदिवस अनाथांन सोबत साजरा करुण बाजीराव दादा चव्हाण यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



## संदेशचा संदेश शिंदे यांच्याकडे पोहचला; सामाजिक कार्यातून राजकीय वाटचालीचा प्रारंभ

कन्नड : तालुक्यातील अनेक दिग्गज नेत्यांनी शिवसेना ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देऊन, शिंदे गटात प्रवेश केल्याची माहिती मिळत आहे. ठाणेमधील आनंद आश्रम या ठिकाणी शिवसेनेचा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. नेहमी चर्चेत असणारे युवा नेतृत्व करणारे, सामाजिक कार्यकर्ते संदेश भाऊ पवार यांनी देखील शिवसेना पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर पक्षप्रवेश केला. यावेळी कन्नड तालुक्याचे नवनिर्वाचित आमदार संजनाताई जाधव, जिल्हाअध्यक्ष भरतभाऊ जाधव, खासदार संदीपानजी भुमरे, तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते. उप मुख्यमंत्राच्या भेटी दरम्यान भरत राजपूत यांनी परिचय देताना संदेश पवार यांच्या सामाजिक कार्याला प्रभावित होऊन तालुक्याची तरुणाई संदेश पवार यांच्या कार्याचे अवलोकन करत असल्याचे सांगितले. तसेच सामाजिक वाटचाली सोबत, संदेश यांची राजकीय वाटचाल अजून रुचकर राहील असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. या वेळी संपूर्ण संदेश पवार मित्र मंडळ उपस्थित होता.

## विशेष



# बारावीच्या विद्यार्थ्यांना आजपासून मिळणार हॉलतिकीट, अशाप्रकारे करा डाऊनलोड

अवघ्या काही दिवसांवर बारावीच्या बोर्डाची परीक्षा आली आहे. त्यामुळे विद्यार्थी अभ्यासात मग्न आहेत. अशातच आता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्वाची बातमी आहे. बारावीच्या परीक्षा या फेब्रुवारी – मार्चमध्ये होणार आहेत. अशातच आता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी–मार्चमध्ये होणाऱ्या बारावीच्या परीक्षेच हॉलतिकीट आजपासून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

### ऑनलाईन प्रवेशपत्र मिळणार :

विद्यार्थ्यांना बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेचं हॉलतिकीट हे ऑनलाईन स्वरूपात देखील मिळणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना www.mahahsscboard.in या अधिकृत वेबसाईटवर जाऊन हॉलतिकीट डाऊनलोड करावं लागणार आहे. मात्र त्यानंतर ऑनलाईन प्रवेशपत्र प्रिंट करून विद्यार्थ्यांना महाविद्यालयातून सही व शिका घ्यावा लागणार आहे.

विद्यार्थ्यांना हॉलतिकीट डाऊनलोड करताना काही तांत्रिक अडचणी आल्या तर त्यांनी माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा, असे आवाहन राज्य मंडळाकडून करण्यात आले आहे.

### हॉलतिकिटवर सही शिक्का घेणे बंधनकारक :

याशिवाय विद्यार्थी संबंधित महाविद्यालयातून ऑफलाईन स्वरूपात देखील हॉलतिकीट घेऊ शकतात. मात्र त्या हॉलतिकिटावर प्राचार्य किंवा मुख्याध्यापक यांचा सही शिक्का घेणे बंधनकारक असणार आहे. तसेच महाविद्यालयातून हॉलतिकीट घेण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाहीत अशी माहिती राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी दिली आहे.

याशिवाय हॉलतिकिटावर काही दुरुस्त्या असल्यास उदा. नाव, आईचे नाव, जन्मतारीख अशी काही दुरूस्त्या असल्यास त्या ऑनलाईन पध्दतीने दुरुस्त करण्यात याव्यात. मात्र त्यासाठी शाळा, महाविद्यालयांनी संबंधित लिंकद्वारे दुरूस्ती शुल्क भरून दुरुस्त्या विभागीय मंडळाकडे मान्यतेसाठी पाठवावे.

# पैठण रंगारहट्टी येथे टाकी बांधूनही पाणी मिळत नसल्याने नागरीक जिल्हाधिकाऱ्यांनाभेटणार

पैठण : सर्जेराव खडसन



पैठण शहरातली सामाजिक कार्यकर्त्यांनी आंदोलन केल्यानंतर पैठण नगर परिषदेच्या समोरील जुन्या तहसील कार्यालयाच्या जागेवर पैठण–आपेगाव विकास प्राधिकरणातून जवळपास ८ लाख लिटरच्या पाण्याची क्षमता असलेली पिण्याच्या पाण्याची टाकी उभारणीसाठी स्थानिक जीवन प्राधिकरणाने तब्बल ४ ते ५ वर्षानंतर सुरुवात केली. या टाकीच्या बांधकामासाठी ठेकेदारांनी कधी काम बंद तर कधी सुरू अशी भुमिका घेतल्यामुळे पाण्याची टाकी पूर्णत्वास येण्यास होणारा विलंब पाहता चिडलेल्या कार्यकर्त्यांनी यासाठी वेळोवेळी आंदोलने करावी लागली.

सदरील पाणी टाकीच्या बांधकामाबाबत पुरातत्व विभागाने काही प्रश्न उपस्थित केल्यानंतर माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे व छत्रपती संभाजी नगर जिल्हाचे विद्यमान खासदार संदिपान पा.भुमरे यांनी हस्तक्षेप करून हा प्रश्न सोडविण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. शेवटी रडत रडत का होईना सन २०२४ च्या अखेरच्या सत्रात टाकीचे बांधकाम पूर्ण झाले खरे परंतु या टाकी बाबत जीवन प्राधिकरण व नगर परिषद पैठण यांच्यात कसल्याही प्रकारचा समन्वय नसल्यामुळे सदरील टाकीचे हस्तांतर लांबणीवर पडत चालले असल्याने शहरातील सुज्ञ नागरीकांमध्ये व यासाठी वेळोवेळी पाठपुरावा केलेल्या सामजिक कार्यकर्त्याकडून संताप व्यक्त केला जात आहे.

त्यातल्या त्यात गेल्या अनेक वर्षापासून शहरातील नागरिकांना कधीच नियमित व वेळेवर पाणी मिळत नसल्यामुळे नागरीकांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. पाणी पुरवठा सारख्या महत्वपूर्ण प्रश्नाबाबत पैठण नगर परिषदेचे सद्यस्थीतील सर्वेसर्वा मुख्याधिकारी संतोष आगळे यांना विचारले असता ते चालढकल करून वेळ मारून नेताना दिसत असल्याचा अनुभव जनतेला येत आहे. शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेले नाथसागर तुडुंब भरलेला आसल्याने शहर परिसरातील नागरीकांना पाण्याचा पुरवठा नियमीत व वेळेवर होणे आवश्यक आहे.परंतु तसे होतांना दिसून येत नसल्यामुळे लावकरच शहरातील पाणी पुरवठा कृती समितीचे एक शिष्टमंडळ सदरील पाण्याच्या टाकी प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेणार असल्याची माहिती शिष्ट मंडळाच्या सदस्यांनी दिली आहे.

# महाराचा माणूस गावात का आला? ....म्हणून बाळू मस्केंना जबर मारहाण!

## महादेव सुर्वे सह तीन अज्ञाताकडून बाळू मस्के यांना जीवे मारण्याचा प्रयत्न

## या घटनेचा जिल्हाभरात विविध संघटना, पक्षांकडून तीव्र निषेध



बीड | अमोल जाधव.

बाळू भिकाजी मस्के या व्यक्तीला जब्बर अमानुष मारहाण केल्याची घटना दिनांक ०७/०१/२०२५ मंगळवार रोजी समोर आली, मानवतेला काळिमा फसणाऱ्या घटनेने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण तयार होताना दिसत आहे .बीड जिल्ह्यात दुसरा संतोष देशमुख होता होता वाचला, कायद्याचा धाक नसणाऱ्या नराधमाना एस पी साहेब चांगला चोप द्या असी आग्रही गावकऱ्यांची मागणी.

प्रकरण सविस्तर असे आहे की ०६/०१/२०२५ सोमवार रोजी बाळू भिकाजी मस्के राहणार भाळवणी तालुका, जिल्हा, बीड हे देवऱ्याची वाडी येथे रात्रीच्या सुमारास यात्रे निमित्त गेले, तिथे गेले असताना बाळू भिकाजी मस्के यांनी दोन महिन्यापूर्वी महादेव पांडुरंग सुर्वे राहणार सूर्याची वाडी तालुका जिल्हा बीड यांचे पाच हजार रुपये हात उसणे घेतलेले होते.

यात्रे मध्ये महादेव पांडुरंग सुर्वे हे भेटल्यामुळे त्यांनी मस्के याना पैसे माघीतल्या नंतर त्यांनी हात उसणे घेतलेले पाच हजार रुपये देऊन टाकले .मात्र सुर्वे यांनी मस्के यांना माझे पैसे मला व्याजानी दि म्हणून बाजूला चल म्हणून जिल्हा परिषद शाळा देवऱ्याचीवाडी येथे घेऊन गेला .सुर्वे यांच्या सोबत असलेले अज्ञात तीन ते चार जण होते माहराचा माणूस गावात का आला म्हणून महादेव पांडुरंग सुर्वे आणि इतर तीन ते चार जणांनी मिळून बाळू मस्के यांचे हात पाय बांधून माहाराचा माणूस गावात का आला, आणि महाराचे लोक मदत करण्याच्या लायकीचे नसतात म्हणत याला आता जीवच मारून टाकू असे म्हणत बाळू मस्के याना चार ते पाच जणांनी लोखंडी रॉड, बेल्ट ने अमानुष मारहाण केली .या घटनेने सर्वत्र खळबळ उडलेली असून या केलेल्या मारहाणी प्रकरणी नेकनूर पोलीस ठाण्यात महादेव पांडुरंग सुर्वे आणि इतर मारेकऱ्यांविरोधात भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ नुसार ११८(१), ११५(२) ३५२, ३५१(२) ३(५) आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ नुसार ३(१)(आर) ३(१)(एस) ३(२)(व्ही ए) नुसार गुन्हा नोंद झालेला असून, बाळू भिकाजी मस्के यांच्या वरती बीड जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार चालू आहेत. बाळू भिकाजी मस्के आणि त्यांच्या परिवाराला काही जीवित हानी झाली तर याला सर्वस्वी संपूर्ण आरोपी जबाबदार असतील, आणि या प्रकरणी पोलिसानी लवकरात लवकर आरोपीना ताब्यात घेऊन कठोर शिक्षा द्यावी अशी मागणी या वेळी मस्के कुटंबियांनी केली.



# वाचन संकल्प महाराष्ट्राचा: एक सामाजिक परिवर्तनाची दिशा!



प्रा. ज्ञानेश्वर आहेर
● ग्रंथपाल, पीईएस मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी (फॉर लेडीज) मोशी, पुणे
मो. ९७६७३१८६५२



आजच्या मोबाईल, सोशल मीडिया व संगणकीय डिजिटल युगात वाचनाची आवड कमी होत चालली आहे अशी परिस्थिती आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया आणि तंत्रज्ञानाच्या वेगवान विकासामुळे केवळ माहिती मिळवण्याचे साधन म्हणून वाचनाची भूमिका कमी झाली आहे हे वास्तव आहे .अशा परिस्थितीत महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत नववर्षाच्या प्रारंभीच एक सकारात्मक निर्णय घेण्यात आला आहे, तो म्हणजे 1 ते 15 जानेवारी २०२५ या पंधरवड्यात राज्यभरातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम सुरू करून वाचन संस्कृतीला प्रोत्साहन व वाचन चळवळ विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी शासनस्तरावर एक महत्वाचे पाऊल उचलन्यात आले आहे. या उपक्रमामुळे वाचनाची गोडी पुन्हा लोकांमध्ये रुजवली जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे असे आपण निसंकोच म्हणू शकतो.

### वाचनाचे महत्तव

आजपर्यंत समाजात जे समाजसुधारक, शास्त्रज्ञ व महान विभूती घडल्या त्यामागील गुपित फक्त वाचन हेच आहे. वाचन हे केवळ ज्ञान प्राप्त करण्याचे साधन नाही, तर तो व्यक्तिमत्त्व विकासासाठी व चांगले जीवन जगण्यासाठी अत्यंत आवश्यक व महत्त्वाचा घटक आहे असे आपण म्हणू शकतो. उत्तम वाचनामुळे व्यक्तीच्या वैचारिकतेला व विचारसरणी धार येते, चांगले व वाईट या मधला फरक लक्षात येतो, संवाद कौशल्य वर्धित होतात आणि सर्जनशीलता वाढते. चांगले वाचन व्यक्तीला मानसिक शांती देते आणि जीवनात संतुलन घडवून आणण्यासाठी महत्वाची भूमिका पार पडते. यामुळे, व्यक्तिमत्व अधिक प्रगल्भ होते आणि समाजाला सकारात्मक बदल घडवण्याची प्रेरणा मिळते.

### उपक्रमाची उद्दीष्टे

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि ती जोपासणे व त्यामाध्यमातून जागरूक व जबाबदार नागरिक घडवून राज्याचा व परिणामी देशाचा विकास सध्या करणे हाच आहे. या उपक्रमामुळे वाचनाची गोडी लागलेल्या मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व स्तरांतील व्यक्तींमध्ये सकारात्मक बदल घडवण्यासाठी एक ठोस पाऊल उचलले गेले आहे. शाळांमध्ये वाचनाची नियमित वेळ दिली जात आहे, तसेच महाविद्यालयीन व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये वाचनाचे महत्त्व सांगून नागरिकांना अधिकाधिक वाचनासाठी प्रोत्साहित केले जात आहे .त्यांना वाचनासाठी प्रेरित करून त्यांना वाचनासाठी सहाय्य केले जात आहे.

### वाचनाची आवड निर्माण करणे

या उपक्रमात राज्यातील नागरिकांना, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लावण्यासाठी व ती रुजवण्यासाठी पंधरवड्यात विविध कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. यामध्ये सामूहिक वाचन, ग्रंथ प्रदर्शन, पुस्तक परिचय आणि लेखक वाचक संवाद कार्यक्रम, निबंध लेखन आणि वाचनानंतर चर्चा यांसारख्या कार्यक्रमांद्वारे मुलांमध्ये वाचनाची गोडी वाढवली जाणार आहे. याचप्रमाणे, वाचनासोबतच सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास देखील साधला जाणार आहे. ग्रंथालयांचा वापर वाढवणे आणि वाचनाची सवय निर्माण करण्यासाठी पालक व शिक्षक यांना देखील महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली गेली आहे.

### समाजातील प्रभाव

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम केवळ शाळा महाविद्यालयांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर त्याचा प्रभाव संपूर्ण समाजावर पसरला आहे. वाचनामुळे लोकांच्या दृष्टीकोनात सकारात्मक बदल होतात. वाचनामुळे व्यक्तीला केवळ ज्ञान मिळत नाही, तर ते त्याच्या विचारशक्तीला आणि दृष्टिकोनाला नव्या दिशा देतात. या उपक्रमामुळे, अधिकाधिक लोक वाचनाच्या महत्त्वाची जाणीव करून घेत आहेत आणि समाजाच्या मानसिकतेत सुधारणा घडवून आणत आहेत.

### निष्कर्ष

हा उपक्रम भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर रंगनाथन यांच्या पंचसूत्री चे अनुकरण करत आहे जो ग्रंथालयाच्या व्यवस्थापनासाठी एक महत्त्वाचा सिद्धांत आहे,

### ग्रंथ वाचकांसाठी असतात

ग्रंथालयातील प्रत्येक ग्रंथाचा उपयोग वाचकांनी करावा, ही यामागील मुख्य कल्पना आहे. ग्रंथ फक्त ठेवून न ठेवता, वाचकांपर्यंत पोहोचवले जावे.

### प्रत्येक वाचकाला त्याचा ग्रंथ मिळाला पाहिजे

प्रत्येक वाचकाच्या गरजेनुसार योग्य ग्रंथ उपलब्ध करून देणे हे ग्रंथालयाचे कर्तव्य आहे.

### प्रत्येक ग्रंथाला त्याचा वाचक मिळाला पाहिजे

ग्रंथालयातील प्रत्येक ग्रंथाला वाचकांपर्यंत घेऊन जाणे व त्याला वाचक मिळवून देणे यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. वरील सिद्धांत ग्रंथालय शास्त्रातील मूलभूत तत्त्वे मानले जातात, जे आधुनिक ग्रंथालय व्यवस्थापण व वाचकांसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. वाचन हे व्यक्तिमत्त्व विकासाचे एक अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम समाजाच्या सर्व घटकांना वाचनाचे महत्व पटवून देत आहे. या उपक्रमाने महाराष्ट्रात वाचनाची गोडी पुन्हा जोपासली जात आहे, आणि यामुळे केवळ शिक्षणातच नव्हे, तर समाजातील समृद्धी आणि प्रगल्भतेमध्ये देखील योगदान मिळणार आहे. प्रत्येकाने या संकल्पात सहभागी होऊन वाचनाची सवय व गोडी वाढवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. "वाचनानेच व्यक्तिमत्त्वात प्रगल्भता येते आणि समाजाला प्रगतीच्या मार्गावर नेले जाते."

# दिल्ली विमानतळावर आढळली मगरीची कवटी



## कॅनडाहून आलेल्या प्रवाशाला घेतले ताब्यात

नवी दिल्ली : दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका प्रवाशाच्या बॅगमध्ये मगरीची कवटी आढळून आली आहे. हा प्रवासी कॅनडाहून आला असून विमानतळावर बॅगची तपासणी करताना ही कवटी आढळून आली. संबंधित व्यक्तीचे नाव जाहीर केले नसले तरी त्याला सुरक्षा अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले आहे.

यासंदर्भात अधिकाऱ्यांनी सांगितले की, कॅनडाहून भारतात आलेल्या एका ३२ वर्षीय तरुणाची बॅग तपासताना काहीतरी अणकुचीदार लागले. त्यामुळे त्याच्या बॅगची सखोल तपासणी करण्यात आली.

यावेळी त्याच्या बॅगमधून मगरीच्या पिल्लाची कवटी सापडली. त्याच्याकडे असलेल्या बॅगेत एका क्रिमी रंगाच्या कपड्यामध्ये मगरीच्या पिलाची कवटी गुंडाळली होती. ही कवटी सुमारे ७७७ ग्रॅम वजनाची आहे अशी माहिती कस्टम अधिकाऱ्यांनी दिली आहे. यासंदर्भातील निवेदनात कस्टम अधिकारी म्हणाले की, भारतात संरक्षित असणाऱ्या मगरीची ही कवटी आहे.

भारतीय वन्यजीव कायद्याचा भंग केल्याचा व कस्टम कायद्याचा भंग केल्याचा ठपका संबधित युवकावर ठेवला आहे. संरक्षित असलेल्या प्राण्याच्या अवयवांची तस्करी करणे हा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असून आता याबाबत कस्टम ऑफिस व वन्यजीव कार्यालय या दोन्हीच्या संयुक्तरितीने कारवाई केली जाणार आहे. ही मगरीची कवटी आता वन्यजीव कार्यालयाकडे हस्तांतरीत करण्यात आली असून. याची आता तपासणी केली जाणार आहे. भारतामध्ये २०११ ते २०२० या कालावधीत विमानतळावरुन वन्यजीवांच्या अवयवांची तस्करीच्या १४१ घटना उघडकीस आल्या आहेत. यामध्ये जवळपास १४६ प्रकारच्या वन्यजीवांची तस्करी करण्याचा प्रयत्न झाला होता. कासव, साप, पाली आदींचा यामध्ये समावेश आहे.

# हिंदी ही राष्ट्रभाषा नाही! अश्विनच्या वादग्रस्त विधानामुळे देशभरात खळबळ



## भाषण करताना 'कोणाला हिंदीमध्ये प्रश्न विचारण्यात रस आहे का, असे विचारले!

चैन्नई : भारताचा फिरकीपटू आर अश्विनने काही दिवसांपूर्वीच बॉर्डर गावसकर ट्रॉफी या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेदरम्यान आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. त्यामुळे आर अश्विन चर्चेच्या स्वरुपात होता. अशातच आर अश्विनने चैन्नईत केलेल्या एका वादग्रस्त विधानामुळे पुन्हा चर्चेत आला आहे.

अश्विनने नुकतीच चेन्नईतील इंजिनियरिंग कॉलेजला भेट दिली. त्यावेळी त्याने विद्यार्थ्यांनसोबत भाषण करताना 'कोणाला हिंदीमध्ये प्रशन विचारण्यात रस आहे का, असे विचारले.

मात्र, कोणीही रस दाखवला नाही. त्यावेळी अश्विनने म्हटले की 'मला वाटलं की मला हे म्हणायला हवं. "हिंदी आपली राष्ट्रीय भाषा नाही, ही अधिकृत भाषा आहे", असे म्हटल्यामुळे देशभरात खळबळ उडाली आहे.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

विशेष

# माजलगाव ग्रामीण पोलिसांची गावठी दारूच्या अड्डयावर धाड!

**18 हजार 750 रुपयांचा केला माल उध्वस्त**






**माजलगाव : प्रतिनिधी**

ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेले शुक्लेश्वर लिमगाव येथील गोदावरी नदीच्या पात्रालगत गावठी दारूच्या अड्डयावर माजलगाव ग्रामीण पोलिसांनी गुरुवार दिनांक ०९ जानेवारी रोजी सापळा रचून धाड टाकली या मध्ये हातभट्टी च्या ठिकाणी गावठी हातभट्टी ३००० रुपये किंमतीची तयार दारू ३० लिटर व १५७५० रुपयांचा कच्च्या गुळाचा रसायन ४५० लिटर असे एकूण १८७५० रुपयांचा मला आढळून आले. या मधील कच्च्या गुळाचा रसायन ४५० लिटर जागेवरच उध्वस्त करून नष्ट करण्यात आले. या मध्ये जगन सुरेश मेंडके रा. शुक्लेश्वर लिमगाव यांच्या वर कार्यवाही करत असल्याचे प्राथमिक माहिती मिळाली आहे. गेल्या १५ दिवात या सारख्या एका पाठोपाठ जवळपास ६ ते ७ च्या वर माजलगाव ग्रामीण पोलिसांनी गावठी दारू असो किंवा देशी विदेशी दारू असो यावर धाडी टाकून त्याठिकाणचे कच्च्या गुळाचा रसायन व इतर वस्तू नष्ट केल्या आहेत. ९ जानेवार रोजी करण्यात आलेली कारवाई पोलीस निरीक्षक कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवलदार राऊत, पोलीस १९४७ बाबरे, महिला पोलीस अंमलदार २२७८ गिरी यांच्या साहाय्याने करण्यात आली आहे.



**श्री, बालक कोळी,**
पोलीस निरीक्षक, माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे



# पुरूष संघात पाच तर महिला संघात तीन खो - खो पटूंची पहिल्या विश्वचषक स्पर्धेसाठी निवड

बीड : नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियम वर १३ ते १९ जानेवारी २०२५ दरम्यान होणाऱ्या पहिल्या खो-खो विश्‍वचषक स्पर्धेसाठी जाहीर झालेल्या भारतीय पुरूष संघात महाराष्ट्रातील पाच तर महिला संघात तिन खो-खोपटूंची निवड झाली आहे. पुरूष संघाच्या कर्णधारपदी प्रतिक वाईकर आणि महिला संघाच्या कर्णधारपदी प्रियंका इंगळेची नियुक्ती करण्यात आली आहे.

खो-खो खेळात महाराष्ट्र राज्याने संपूर्ण देशात वेगळी ओळख निर्माण केली आहे. जागतिक स्तरावरील पहिल्या स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळांडूचा दबदबा कायम राहणार आहे. नवी दिल्ली येथे झालेल्या निवड चाचणीनंतर आज भारताचे पुरूष आणि महिलांचे संघ जाहीर करण्यात आले. पुरूष संघात प्रतिक वाईकर (कर्णधार), सुरेश गरगटे, आदित्य गनपुले, रामजी कश्यप, अनिकेत पोटे तर महिला गटात प्रियंका इंगळे (कर्णधार), अश्विनी शिंदे, रेश्मा राठोड यांची निवड झाली आहे. भारतीय संघात निवडले गेलेले खेळाडूंनी राष्ट्रीयस्तरावर उत्तमोत्तम कामगिरी केली आहे. तसेच पुरूष संघाच्या प्रशिक्षकपदी शिरीन गोडबोले आणि महिलांच्या प्रशिक्षकपदी प्राची वाईकर यांची निवड झाली आहे. भारतीय संघाची निवड महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे माजी सचिव व खजिनदार गोविंद शर्मा, एम. सीतारामी रेड्डी, उपकार सिंग विर्क, सुषमा गोळवलकर, एस. एस. मलिक, डॉ. मुन्नी जून (एमडीयू), नितुल दास, वंदना पी. शिंदे, आनंद पोकार्डे तर भारतीय खो-खो महासंघाचे अध्यक्ष सुधांशू मित्तल आणि सरचिटणीस पदसिध्द असलेल्या समितीने केली आहे. महाराष्ट्राच्या निवडल्या गेलेल्या खेळाडूंचे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, भारतीय खो-खो महासंघाचे सहसचिव प्रा. डॉ. चंद्रजित जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# सिंदफणा स्कूलचे मुला-मुलींची क्रिकेट संघ, करणार आंतरराष्ट्रीय स्पर्धेत देशाचे प्रतिनिधित्व

माजलगाव / अरविंद ओव्हाळ : विद्याभुवन शिक्षण प्रसारक मंडळाच्या सिंदफणा पब्लिक स्कूलने क्रीडा क्षेत्रात मोठी मजल मारली आहे. शाळेच्या १४ व १७ वर्षाखालील क्रिकेट संघांनी राष्ट्रीय स्पर्धेत दमदार कामगिरी करत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत स्थान मिळवले आहे. याबद्दल शाळेवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

सविस्तर वृत्त असे की, गोव्यातील पेडीम येथे ६ ते ८ जानेवारी २०२४ दरम्यान झालेल्या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत शाळेच्या दोन्ही संघांनी सुवर्णपदक पटकावले. १७ वर्षाखालील मुलांच्या संघाने कर्नाटक, तेलंगणा व तामिळनाडू संघांना मागे टाकत प्रथम क्रमांक पटकावला. आदिल शाह यांच्या नेतृत्वाखाली संघाने दमदार खेळी करत विजयश्री मिळवली. १७ वर्षाखालील विजयी संघ : आदिल शाह (कर्णधार), संभाजी जगताप, आदर्श मगर, वरद गुज्जर, विकास बुरगे, सार्थक सोळंके, सार्थक गायकवाड, संभाजी वाळसकर, शेष गिरी, श्रेयस थावरे, रोहन बजाज, अर्णव कुलकर्णी इत्यादी विद्यार्थ्यांचा समावेश होता.

१४ वर्षाखालील मुलींच्या गटात आरुषी कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील संघाने कर्नाटक व तेलंगणा संघांचा धुव्वा उडवत सुवर्णपदक जिंकले.
१४ वर्षाखालील विजयी संघ : आरुषी कुलकर्णी (कर्णधार), अनुष्का सोळंके, अक्षरा सोळंके, मानसी जगताप, श्रेया जाधव, अक्षरा बादाडे, अनन्या मुंडे, पूर्वा मालानी, श्रुती चव्हाण, रिद्धी डाके, वेदिका आगे, वेदिका गवते या विद्यार्थ्यांचा समावेश होता. या विजयामुळे दोन्ही संघांना नेपाळमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत (६ ते ८ फेब्रुवारी २०२५) सहभागी होण्याची संधी मिळाली आहे.





शाळेच्या या यशस्वी खेळाडूंचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके, उपाध्यक्ष विरेन सोळंके, सचिव मंगलताई सोळंके, समन्वयक नीला देशमुख, प्राचार्य अन्वर शेख, उपप्राचार्य राहुल कदम, शाळेचे क्रीडा संचालक दीपक माने क्रीडा शिक्षक पुरुषोत्तम सोळुंके सचिन मंजुळे वैशाली सोळंके सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक यांनी त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कामगिरीमुळे बीड जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून, विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# औरंगाबाद येथील आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या बैठकीस उपस्थित राहावे - सय्यद सलीमबापू

माजलगाव / प्रतिनिधी : आगामी स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसह इतर महत्त्वपूर्ण विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी औरंगाबाद येथे १४ जानेवारी नाम विस्तार दिनानिमित्त आंबेडकरी विचार मोर्चाच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस संघटनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.



दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे की, येत्या १४ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता मिलिंद कॉलेज परिसर (औरंगाबाद) संभाजीनगर येथे राज्य कार्यकारिणीची महत्व पुर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे, सदर बैठकीत भिम सैनिकांची समस्या, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आंरिमोची भुमिका, रिपब्लिकन नेत्यांनी आंबेडकरी विचारधारे सोबत केलेली बेइमानी, आंरिमो का निष्क्रिय पदाधिकारी यांची हकालपट्टी इत्यादी विषयांवर बैठकिचे आयोजन केले आहे.

त्याचप्रमाणे १४ जानेवारी मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार वर्धापन दिनानिमित्त भिम सैनिक दखल मार्चचे आयोजन ही करण्यात आले आहे. सदर बैठकीला राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे संबोधित करणार आहेत. या करिता राज्यातील सर्व जिल्हा, तालुका, अध्यक्ष, पदाधिकारी, सभासद यांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक चंद्रकांत सोनावणे अध्यक्ष, औरंगाबाद, दिक्षा गायकवाड महिला जिल्हाध्यक्ष, श्यामभाई बागुल प्रसिद्धी आणि प्रसारण प्रमुख औरंगाबाद, मराठवाडा प्रदेश अध्यक्ष सय्यद सलीमबापु यांनी केले आहे.

# आज माजलगावात उद्या किट्टी आडगावात रक्तदान शिबीर

माजलगाव / प्रतिनिधी : अनंत श्री विभूषित जगद्‌गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज जगद्‌गुरू रामानंदाचार्य दक्षिण पीठ, नाणीजधाम महाराष्ट्र यांचे वतीने रक्तदान महायज्ञाचे आयोजन केले असुन आज माजलगावात तर उद्या किट्टी आडगावात रक्तदान शिबीर होणार असुन रक्तदान करावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. जगद्‌गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानतर्फे दरवर्षी रक्तदान महायज्ञाचे आयोजन केले जाते. यावर्षीही दि. ४ ते १९ जानेवारी दरम्यान रक्तदान शिबीर आयोजीत केले आहे. शहरातील जुना मोंढ्यातील गणपती मंदिरात दि. ११ जानेवारीला तर दि. १२ जानेवारीला तालुक्यातील किट्टी आडगाव येथील रामंदिरात रक्तदान शिबीराचे आयोजन असुन या रक्तदान शिबीरात रक्तदान करावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.





## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचाळा येथे आनंदनगरीचे आयोजन

विहामांडवा : जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा चिंचाळा येथे आनंदनगरीचे आयोजन करण्यात आले. या दरम्यान आनंद नगरीचे उद्‌घाटन शालेय समिती अध्यक्ष श्री स्वामीनाथ येवले उपाध्यक्ष दत्ता पाटील बोडखे यांच्या हस्ते व शालेय समिती सदस्य भरत बोडखे, बिबीशन बोडखे, हरी खैरे, प्रकाश राजगुरू, संभाजी बोडखे, स्वामी खैरे, अंकुश बनसोडे, वसंत गरड, पालक राम बोडखे, पांडुरंग बोडखे, विजय कोळपकर, पोलीस पाटील हरिराम बोडखे व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित मध्ये करण्यात आले. या दरम्यान पहेली ते आठविच्या शाळा परिसरात विद्यार्थ्यांनी विविध अनेक प्रकारचे खाद्य पदार्थांचे स्टॉल लावण्यात आले होते. या निमित्त विद्यार्थ्यांना आर्थिक व्यवहाराची ज्ञान मिळावे यासाठी आनंद नगरी चे आयोजन करण्यात आले होते.
या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेचे मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख श्री मधुकर शेळके सर, पदवीधर शिक्षक संजय गवांदे सर, काकासाहेब ढीलपे सर, सहशिक्षक बाबासाहेब येळे सर, अमोलराज शेळके सर, प्रवीण बोडखे सर, छाया कराड मॅडम, साधना इप्पर मॅडम अंगणवाडी सेविका बेबीताई बोडखे मॅडम आदींनी मेहनत घेतली.

# मराठवाडा मुक्ती संग्रामामध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांचे योगदान अतुलनीय - डॉ. भालचंद्र कुलकर्णी

माजलगाव / अरविंद ओव्हाळ : स्वामी रामानंद तीर्थ यांनी हैद्राबाद संस्थानामध्ये सामान्य लोकांसाठी कार्य करताना शैक्षणिक सामाजिक प्रबोधन करण्या साठी अथक प्रयत्न केले त्यामुळे ही चळवळ स्वातंत्र्य लढा झाली. असे प्रतिपादन इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. भालचंद्र कुलकर्णी यांनी केले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर विद्यार्थी विकास मंडळ आणि भा शि. प्र. संस्था अंबाजोगाई संचलित स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफताना प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक व भा शि. प्र संस्था केंद्रीय सदस्य प्रकाश दुगड, प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी, विद्यार्थी कल्याण मंडळ प्रमुख डॉ प्रे. म. राठोड यांची उपस्थिती होती.






मान्यवरांच्या हस्ते प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

'स्वातंत्र्य उत्तर काळात मराठवाडा प्रदेशाच्या विकासात स्वामी रामानंद तीर्थ यांचे योगदान' या विषयी सविस्तर मांडणी करताना ते म्हणाले की, मराठवाडा मुक्ती संग्रामचा लढा हा स्वातंत्र्याचा अखेरचा लढा होता या लढ्यामध्ये शिक्षकांचा सक्रीय सहभाग होता त्यामुळे मराठवाड्याच्या शैक्षणिक विकासात स्वामी रामानंद तीर्थ यांनी अंबाजोगाई, नांदेड या भागामध्ये भरीव योगदान देत लोकांचा शैक्षणिक विकास साधत त्यांचे राष्ट्रीयत्व जागे केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी म्हटले की, तरुण पिढीसमोर आपल्या भागातील वीरांचा इतिहास समोर ठेवून त्यापासून प्रेरणा देण्याचा स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेचा उद्देश आहे. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना संकुलाचे पालक व भा शि. प्र. संस्थेचे केंद्रीय सदस्य प्रकाश दुगड म्हणाले की, मराठवाड्याला विकासाच्या प्रवाहात आणण्याचा अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी प्रयत्न केला. त्यामध्ये स्वामी रामानंद तीर्थ अग्रणी होते. अशा वीरांच्या गाथा व्याख्यानातून स्मरण केल्या तरच तरुणांमध्ये राष्ट्रभक्ती जागृत ठेवता येईल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ जिजाराम बागल यांनी केले. तसेच कार्यक्रमात मान्यवरांचे आभारआणि कल्याण मंत्र डॉ प्रेम राठोड यांनी केले.

या व्याख्यानास बहुसंख्य प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

**निधन वार्ता**

## रवी संभाजी लहाने यांचे अल्पशा आजाराने निधन

छत्रपती संभाजीनगर : येथील रा. जे - सेक्टर मुकुंदवाडी, छ. संभाजीनगर रवी संभाजी लहाने (45) यांचे 10 जानेवारी 2025 रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर मुकुंदवाडी येथील स्मशानभूमीत उद्या ११ जानेवारी रोजी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.



रवी संभाजी लहाने हे मागील काही दिवसांपासून आजारी होते. अनेकांनी त्यांच्या दिर्घायुष्यासाठी प्रार्थना केली होती. पण कुटूंबियांनी सर्व शर्थिचे प्रयत्न करूनही त्यांना वाचवण्यात यश आले नाही. रवी लहाने हे अत्यंत मनमिळावू स्वभावाचे होते. त्यांच्या अल्प आयुष्यात त्यांनी खूप चांगली माणसे जोडून ठेवली होती. त्यांच्या अकाली निधनाने कुटूंबिय आणि मित्र परिवारासह प्रत्येकालाच मोठा धक्का बसला आहे.

त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, एक मुलगी 2 मुले, बहिणी असा परिवार आहे. रवी लहाने यांच्या अकाली निधनाने जो धक्का कुटूंबियांना बसला आहे त्यांना या संकटातून सावरण्यासाठी शक्ती मिळो अशी 'वास्तव' कडून प्रार्थना करण्यात येत आहे.

**१२ वर्षापासुन सातत्याने होताहेत कार्यक्रम** ● ऑनेस्टी पब्लिक स्कूलमध्ये क्रिडा सप्ताहचे उद्‌घाटन

# बुद्धी साठी वाचनाची गरज आहे तशी शरीरासाठी खेळाची गरज- योगा प्रशिक्षक गीता गायके

माजलगाव / अरविंद ओव्हाळ : येथील ऑनेस्टी पब्लिक स्कूल मध्ये गेली १२ वर्षापासुन सातत्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. त्यापैकी क्रिडा सप्ताह हा उपक्रम सात दिवस चालविला जातो त्यामधे मैदानी खेळ, धावणे, बेडूक उडी, नेमबाजी, बुद्धिबळ, बॉल स्टिक, संगीत खुर्ची असे अनेक खेळ घेतले जातात. या क्रिडा सप्ताह चे उद्‌घाटन योगा प्रशिक्षक गीता गायके यांच्या हस्ते करण्यात आले.

तसेच शिवाजी नगर येथील युनिट दोन चे क्रिडा उद्‌घाटन प्रियंका भुतडा यांच्या हस्ते झाले.

यावेळी दोन्ही पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. लहान वयात मैदानी खेळाचे आयोजन करणारी ऑनेस्टी शाळा अग्रस्थानी असते. शरीर विकासासाठी खेळाची गरज आहे असे त्यांनी सांगितले.. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल वाघ, प्राचार्या अमृता तौर, वनिता राठोड, सांस्कृतिक व क्रिडा प्रमुख पल्लवी गायकवाड, प्रभा हरकळ, शाळेच्या को-ऑर्डिनेटर जयश्री जाधव, सुप्रिया गरुड, संगीत शिक्षक श्रुती कुलकर्णी, वर्षा दीक्षित, शिल्पा सोळंके, अश्विनी घुबडे, स्वाती रुद्रवार, कराटे प्रशिक्षक अंजली ढेरे, सुशीला जोशी, ठोसरे ताई, अस्मिता टाक, लता गाडेकर यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गायत्री देशमुख यांनी केले.



